**सन २०२५-२६ पासून +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विना-अनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी २६२५/प्र.क्र.४१/कौशल्य-२**

खोली क्र. ४३५, चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ११ जून, २०२५

**वाचा :**
१) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीओसी-२०१७/प्र.क्र.१५७/व्यशि-४, दिनांक १० मे, २०१८.
२) कौशल्य ,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीओसी- २०२३/प्र.क्र.१४/कौ-२, दिनांक २० जून, २०२३.
३) कौशल्य ,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीओसी- २०२३/प्र.क्र.१४/कौ-२, दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३.
४) कौशल्य ,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीओसी- २०२४/प्र.क्र.२५/कौ-२, दिनांक १४ मार्च, २०२४.
५) कौशल्य ,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीओसी- २०२४/प्र.क्र.१४/कौ-२, दिनांक ०६ जून, २०२४
६) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.५ विना. अनु.मान्यता/२०२५/२०, दि.२१ मे, २०२५.
७) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.५ विना. अनु. मान्यता/२०२५/प्र.क्र. ४०/२७ व २८, दि.२७ मे, २०२५.
८) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.५ विना. अनु.मान्यता/२०२५/प्र.क्र. ४०/२९, दि.२८ मे, २०२५.
९) कौशल्य ,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीओसी- २०२३/प्र.क्र.१४/कौ-२, दिनांक ३० मे, २०२५

**प्रस्तावना :**

पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम, +२ स्तरावरील द्विलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देण्यासाठीच्या ऑनलाईन प्रमाणित कार्यपध्दतीस संदर्भ क्र. १ येथील दि. १०.०५.२०१८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातंर्गत सद्यस्थितीत सुरु असणारे +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम बंद करून राष्ट्रीय व्यवसाय आराखडयाप्रमाणे ( National Skill Qualification Framework ) नवीन अभ्यासक्रम सर्व शासकीय, अशासकिय अनुदानित व अशासकिय कायम विनाअनुदानित संस्थामध्ये शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून सुरु करण्यास संदर्भ क्र. २ येथील दि. २०.०६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यांत आली आहे. तसेच सदर नवीन अभ्यासक्रमांची अमंलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे व सुधारीत मानकांना संदर्भ क्र. ३ येथील दि.१४.११.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यांत आलेली आहे. त्यानुसार राज्यात शासकीय, अशासकीय अनुदानित व अशासकीय कायम स्वरुपी विनाअनुदानित संस्थांमधील सद्यस्थितीत सुरु असणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांऐवजी सुधारीत NSQF रूपांतरीत नवीन व्यवसाय अभ्यासक्रमांना शाळा / संस्थानिहाय मान्यता संदर्भ क्र. ४ येथील दि. १४.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली आहे. तथापि, संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये NSQF रूपांतरीत नवीन व्यवसाय अभ्यासक्रम शैक्षणिक सत्र २०२४-२५ राबविण्यास स्थगिती देण्यात आली. तदनंतर संदर्भ क्र. ९ येथील शासन निर्णयान्वये सदर स्थगितीस शैक्षणिक सत्र २०२५-२६ व २०२६-२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यासाठी ज्या संस्थानी / महाविद्यालयांनी नवीन किंवा अधिकच्या तुकडयांना कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यात आले आहेत, त्यांना त्यासंबंधीचे मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर शैक्षणिक सत्र २०२५-२६ पासून सदर अभ्यासक्रम राबविता येतील, असे नमूद करण्यात आले आहे.

+२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयाकरीता निरीक्षण समिती मार्फत प्राप्त झालेल्या अर्जाची संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई स्तरावर छाननी करून संचालनालयाकडून योग्य त्या शिफारशीसह प्रस्ताव संदर्भ क्र.६ येथील दिनांक २१ मे, २०२५, संदर्भ क्र.७ येथील दिनांक २७ मे, २०२५ व संदर्भ क्र. ८ येथील दि. २८ मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सन २०२५-२६ पासून +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :**

शैक्षणिक संस्थांकडून ऑनलाईन प्रणालीद्वारेव्दारे प्राप्त दस्तावेजांची छाननी करुन त्यानुसार आवश्यक मानकांची पुर्तता करणाऱ्या ६१ संस्थांच्या एकूण ९३ तुकडयांना +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांना मान्यता देण्याकरीता संचालनालयाकडून शिफारस करण्यात आली आहे. त्या संस्थांचा तपशिल सोबतच्या **प्रपत्र "अ"** मध्ये सोबत जोडण्यात आला आहे. सदर संस्थांना सन २०२५-२६ पासून +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या विद्यमान तसेच नवीन संस्थेत नवीन/अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

१) संबंधित संस्थेस माध्यमिक शाळा संहिता १९८१ मध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तींची पुर्तता करणे बंधनकारक राहील. परवानगी प्राप्त झाल्यानंतर संस्थेला माध्यमिक शाळा संहिता व एम.ई.पी.एस. नियम १९८१ नुसार आवश्यक ते सर्व लेखे संस्था स्तरावर ठेवणे बंधनकारक राहील.संस्थेने माध्यमिक शाळा सहितेतील नियमांचे पालन न केल्यास अथवा शासनाने व संचालनालयाने दिलेल्या आदेशाचे, परिपत्रकाचे पालन न केल्यास संस्थेची मान्यता तात्काळ रद्द करण्यात येईल.

२) मान्यता अभ्यासक्रमांच्या नविन/अधिकच्या तुकडया सुरु करण्यास कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता दिली असली तरीही, भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

३) मान्य अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना शासन / संचालनालय / संचालनालयाच्या अखत्यारीतील संबंधित कार्यालये यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४) शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले शिक्षण शुल्क विदयार्थ्यांकडून आकारणे संस्थेस बंधनकारक राहील. संस्थेस कमाल मर्यादेपेक्षा जास्त शुल्क विदयार्थ्यांकडून आकारता येणार नाही.

५) "**कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळालेले +२ स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम**" असा सूचनाफलक संस्थांनी दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. सूचना फलकावर अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकडयांची संख्या व मंजूर प्रवेशक्षमता यांचा उल्लेख करण्यात यावा.

६) सदर अभ्यासक्रमांना कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमाकरीता संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची सेवा /वेतन व तदनुषंगिक बाबींची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. याबाबत शासन कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

७) मंजूर अभ्यासक्रमाकरीता आवश्यक शिक्षकीय कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या, त्यांची किमान शैक्षणिक अर्हता, अनुभव याबाबत संस्थेने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतुदींनुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तात्काळ करण्यात यावी व संबंधित जिल्हयाचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी प्रवेश यादयांना मान्यता देण्यापूर्वी विहीत अर्हताधारक शिक्षकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे याची खात्री करावी व त्यानंतरच प्रवेश यादयांना मान्यता दयावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयास, प्रादेशिक कार्यालयामार्फत सादर करावा.

८) भविष्यात सदरचे अभ्यासक्रम बंद करण्याबाबत किंवा त्यात काही बदल करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्यास तो विनाअट व विनाविलंब संस्थेने अंमलात आणणे आवश्यक राहील.

९) अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकडयांमधील प्रवेशाकरीता, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले सामाजिक/समांतर आरक्षण व इतर नियमांचे संस्थेने काटेकोरपणे पालन करावे व गुणानुक्रमे प्रवेश देण्यात यावेत.

१०) अभ्यासक्रमांना मंजूरी मिळाल्यानंतर सदर अभ्यासक्रम संस्थेत सुरू केल्याची माहिती संस्थेने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळास तात्काळ दयावी व त्याबाबतची अनुषंगिक कार्यवाही करावी.

११) मान्यता देण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या अधिकच्या/नविन तुकडयांची प्रवेशक्षमता प्रति तुकडी ५० इतकी असुन, मंजूर प्रवेशक्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास अश्या तुकडया सुरू ठेवण्याकरीता संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

१२) मान्यता प्राप्त अभ्यासक्रम मान्यता दिलेल्या शैक्षणिक वर्षात संस्थेने सुरु न केल्यास अथवा सदर अभ्यासक्रमाच्या तुकडीत सतत ३ वर्ष मंजूर प्रवेशक्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास सदर संस्थेची मान्यता आपोआप रद्द होईल. तद्नंतर संस्थेस सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता प्रक्रिया नव्याने करणे आवश्यक राहील.

१३) शासनाने मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचा दर्जा व गुणवत्ता उच्च प्रतीचा राखण्याच्या दृष्टीने संचालनालय स्तरावरुन नियमितपणे प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रशिक्षण गुणवत्ता तपासण्यासाठी प्रत्येक वर्षी ७५% पेक्षा कमी निकाल असणाऱ्या संस्थेचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात येईल. एखाद्या संस्थेचा निकाल सतत ३ वर्षामध्ये ७५% पेक्षा कमी असल्यास सदर संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

१४) शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे किंवा नवीन अटी व शर्ती अंर्तभूत करण्याचे अधिकार शासनास राहतील.

१५) संबंधित संस्थेने त्यांच्याकडे भाषा/ जीवशास्त्र इत्यादी विषयाचे शिक्षक, मंजूर केलेल्या द्विलक्षी अभ्यासक्रमांच्या तुकडीमुळे अतिरिक्त ठरणार नाहीत याची खातरजमा करूनच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

१६) व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत मंजूर व्यवसाय अभ्यासक्रमाच्या मंजूर तुकडीनुसार मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरिक्त अनधिकृत प्रवेश करता येणार नाही. याकरीता संस्थेस "महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यासक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३" लागू राहील.

१७) द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमातील विषयामध्ये शासनाने राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा (NSQF) नुसार बद्दल केल्यास त्याप्रमाणे अभ्यासक्रम राबविणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१७) संबंधित संस्थेने त्यांच्याकडे भाषा/जीवशास्त्र इत्यादी विषयाचे शिक्षक, मंजूर केलेल्या द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या तुकडीमुळे अतिरिक्त ठरणार नाहीत याची खातरजमा करूनच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

३. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रपत्र “अ” नुसार मान्यता दिलेल्या संस्थांनी व्यवसाय अभ्यासक्रम सुरू केले, याबाबत तसेच अभ्यासक्रमनिहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या याबाबतची माहिती संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी शासनास सादर करावी.

४. सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र “अ” मधील अ.क्र. ६१ येथे नमूद संस्थेस +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम (NSQF रुपांतरीत नवीन जॉबरोल) सुरू करण्यासाठी आवश्यक असणारे मानके व अटींची पूर्तता करण्याच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५०६१११११४०१६१६०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRADEEP SAHEBRAO SHIVTARE

Digitally signed by PRADEEP SAHEBRAO SHIVTARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILL EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=12a2d958f75709e9720b38b5349dae16ef85e08a91e69f77d8b94222ab9dc13c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=415BAA8242ED5D99644FE1533246B0A85DC3D52848FB6CE23F47DAF8D647AE5A, cn=PRADEEP SAHEBRAO SHIVTARE
Date: 2025.06.11 11:46:16 +05'30'

**( प्रदीप सा. शिवतरे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र राज्य, विधान भवन मुंबई.
६. मा.सभापती,विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, विधान भवन मुंबई.
७. सर्व मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
१०.सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य, विधान भवन, मुंबई.
११. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव ,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.अपर मुख्य सचिव ,कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय,मुंबई
१४.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५.सर्व विभागीय शिक्षण उप संचालक, (शालेय शिक्षण विभाग), ( संचालनालयामार्फत )
१६.सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,मुंबई / नाशिक/ पुणे/ औरंगाबाद/ अमरावती/नागपूर (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत)
१७.संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, (संचालनालयामार्फत )
१८. संबंधित अशासकीय संस्था (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत )
१९. निवड नस्ती. (कौशल्य-२).

शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी २६२४/प्र.क्र.४१/कौशल्य-२, दि. ११.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयासोबतचे जोडपत्र

## प्रपत्र-अ

शैक्षणिक सन २०२५-२६ पासून +२ स्तरावरील व्दिलक्षी अभ्यासक्रमांच्या नविन संस्था/विद्यमान संस्थेत अधिकच्या तुकड्यांना कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेल्या संस्था

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | PBF240109187T | मोहटादेवी सेवा प्रतिष्ठानचे, सनराईज कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा जि. अहिल्यानगर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| २ | छ.संभाजी नगर | PBF71005T | चिऊ काऊ बाल संस्कार मंडळाचे श्री.गजानन ज्युनिअर कॉलेज, शिवनेरी कॉलनी, रांजनगाव, ता.गंगापूर .छत्रपती संभाजीनगर-४३११३६ | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोवर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| | | | | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ३ | छ.संभाजी नगर | PBF240109050T | श्री.गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, येलदरी कॅम्प एआरटीएम इंग्लिश स्कूल उच्च माध्यमिक विद्यालय, सेनगाव ता.सेनगाव जि.हिंगोली-४३१५४ | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ४ | छ.संभाजी नगर | PBF02274T | बळीराजा एकात्मिक ग्रामविकास बहुउद्देशिय संस्था, वसंतनगर, नांदेड संचलित सरस्वती इंटरनॅशलन स्कूल, कुरताडी, वारंगा फाटा जवळ ता.कळमणुरी जि.हिंगोली. | गट ८ | स्मॉल पॉल्ट्री फार्मर<br>डेअरी फार्मर/ डेअरी इंटरप्रिनर | १ |
| | | | | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| | | | | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोवर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| ५ | छ.संभाजी नगर | PBF240109032T | श्री.वीश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, अलमाळा ता.औसा जि. लातुर संचलित ब्ल्यु बर्ड इंटरनॅशनल स्कूल, अलमाळा ता. औसा जि.लातूर | गट २ | फिल्ड टेक्निशियन एअर कंडीशनर<br>फिल्ड टेक्निशियन कंप्युटिंग अँड पेरिफेरल | १ |
| ६ | छ.संभाजीनगर | PBF08712T | एकलव्य मागास सेवा समिती मानखेड ता.अहमदपुर जि.लातूर संचलित रेनुकादेवी हायर सेकंडरी आश्रम स्कूल, वसंतनगर (महापूर) ता.अहमदपूर जि.लातूर-४१३५२७ | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोवर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| | | | | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | छ.संभाजी नगर | PBF240109049T | श्री.वीश्वेश्वरय्या शिक्षण प्रसारक मंडळ अलमाळा, ता.औसा जि.लातूर संचलित वीश्वेशरय्या पब्लिक स्कूल इस्कॉन टेम्पल जवळ, वासनगाव, लातूर | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोवर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| ८ | छ.संभाजी नगर | PBF08850T | नवरत्न प्रमोद मेमोरीअल एज्युकेशन सोसायटी, नांदेड संचलित टायनी ॲजल्स माध्य. उच्च माध्य. विद्यालय, लक्ष्मीनगर, पोस्ट यशवंत नगर, वाडी बु.नांदेड-४३१६०२ | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | १ |
| ९ | अमरावती | PBF240109171T | श्री.दत्ता मेघे बालकल्याण शिक्षण संस्था, नागपूर संचलीत स्कूल ऑफ स्कॉलर्स, गट नं १० लोहारा ता.जि..यवतमाळ-४४५००१ | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | १ |
| १० | अमरावती | PBF240109175T | स्व राधीकाबाई मेघे महील शिक्षण संस्था, नागपूर संचलित स्कूल ऑफ स्कॉलर्स, कौलखेड, हिंगणा रोड, अकोला-४४४ ००४ | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | १ |
| ११ | नागपूर | PBF240109061T | श्री विद्यार्थी सुधार संघ संचलीत महात्मा गांधी इंग्लिश मिडीयम हाय स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज, वायसीसीई कॅम्पस, वनडोंगरी ता.हींगणा जि.नागपूर-४४००२५ | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | १ |
| १२ | नागपूर | PBF240109173T | स्व.राधिकाबाई मेघे महिला शिक्षण संस्था, नागपूर स्कूल ऑफ स्कॉलर्स, मौजे परसोडी, राणा प्रतापनगर,नागपूर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | १ |
| १३ | पुणे | PBF240109131T | कोडोळी विभाग शिक्षण संघ, कोडोळी संचलित कोडोळी हायस्कूल ॲण्ड भाई एस. टी. पाटील अप्पा ज्यु. कॉलेज,कोडोळी, ता.पन्हाळा जि. कोल्हापूर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| १४ | छ. संभाजी नगर | PBF70913T | बायजाई एज्युकेशन ट्रस्ट छ.संभाजीनगर संचलित एव्हीएस ज्यु.कॉलेज ऑफ आर्ट,कॉमर्स ॲण्ड सायन्स, बीड बायपास रोड, सत्यसाई मंदीर च्या मागे, सातारा कॅम्पस, छ.संभाजीनगर-४३१०१० | गट ४ | ऑरगॅनिक ग्रोवर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| १५ | नागपूर | PBF08778T | श्री.व्यंकटेश शिक्षण प्रसारक मंडळ संचलित प्रबोधन कॉन्वेंट हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज,मुंजे सभागृह समोर, महाल, नागपुर ४४००३२ | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| १६ | नागपूर | PBF08768T | धर्मपेठ शिक्षण संस्था संचलित तारकुंडे धर्मपेठ हाय स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, नॉर्थ अंबाझरी रोड,नागपुर ४४००१० | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | १ |
| १७ | पुणे | PBF240109067T | ज्ञानज्योती बहुउद्देशिय सार्वजनिक संस्था, खांडळी संचलित माईलस्टोन पब्लिक स्कुल खांडळी संचलित चिंचगाव ता.माढा जि.सोलापूर-४१३२०८ | गट ६ | अग्रिकल्चर मशिनरी ऑपरेटर<br>प्लम्बर जनरल | १ |
| | | | | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | नाशिक | PBF240109164T | विवेकानंद प्रतिष्ठाण व संशोधन केंद्र चोपडा संचलित विवेकानंद इंग्लिश मिडीयम अॅन्ड ज्युनिअर कॉलेज चोपडा जि.जळगाव | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग अॅण्ड पेरीफेरल्स | १ |
| १९ | मुंबई | PBF240109109T | आदर्श विकास मंडळ संचलित आदर्श विकास मंडळ बाल विद्या मंदिर आणि कर्मवीर भाऊराव पाटील ज्युनियर कॉलेज,नेहरु नगर, वागळे इस्टेट, ठाणे | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग अॅण्ड पेरीफेरल्स | १ |
| २० | नागपूर | PBF240109268T | सी.पी. अॅण्ड बेरार एज्युकेशन सोसायटी महाल,सी.पी. अॅण्ड बेरार हायस्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज, महाल, नागपुर. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग अॅण्ड पेरीफेरल्स | १ |
| २१ | छ. संभाजीनगर | PBF240108991T | चतुराई प्रतिष्ठाण चुंचा संचलित कॅंब्रिज ज्युनिअर कॉलेज, म.पो चुंचा, जि.हिंगोली | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग अॅण्ड पेरीफेरल्स | १ |
| २२ | नागपुर | PBF240108884T | ओसवाल एज्युकेशन संस्था संचलित एमकेएच संचेती पब्लिक स्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज, हिंदुस्थान नगर, साई मंदीर समोर, नागपुर | गट ४ | फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग अॅण्ड पेरीफेरल्स<br>ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर | ३ |
| २३ | नागपुर | PBF240109388T | छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित सरस्वती हायस्कूल अॅण्ड ज्यु.कॉलेज न्यू पंजारा, कोराडी ता.कामटी जि.नागपूर | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोवर<br>इंटिग्रेशन सर्व्हिस टेक्नीशियन | १ |
| | | | | गट १० | फ्लॉरिकल्चरिस्ट (ओपन कल्टीवेशन)<br>गार्डनर | १ |
| २४ | नागपुर | PBF240109169T | श्री.दत्ता मेघे बालकल्याण शिक्षण संस्था, वर्धा संचलित स्कूल ऑफ स्कॉलर्स, सावंगी मेघे, वर्धा-४४२००१ | गट ४ | फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग अॅण्ड पेरीफेरल्स<br>ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर | १ |
| २५ | पुणे | PBF240109226T | अनेकांत एज्युकेशन सोसायटी संचलित तुलजाराम चतुरचंद कॉलेज बारामती जि. पुणे | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोवर<br>इरिगेशन सर्विस टेक्नीशियन | २ |
| २६ | अमराती | PBF240109063T | आयडीयल एज्युकेशन सोसायटी, अकोला संचलित कॅप्टन एन.टी.घैसास ज्युनियर कॉलेज, खेतान नगर,कौलखेड ४४४००१ | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग अॅण्ड पेरीफेरल्स | १ |
| २७ | अमरावती | PBF70908T | सिपना शिक्षण प्रसारक मंडळ अमरावती संचलित सिपना ज्युनिअर कॉलेज, निंभोरा बडनेरा रोड, अमरावती ४४४६०५ | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग अॅण्ड पेरीफेरल्स | १ |
| २८ | मुंबई | PBF240109378T | जगदीश कृष्णा एज्युकेशनल सोसायटी संचलित ग्लोबल इंटरनॅशनल हायस्कूल ज्युनियर कॉलेज, भिवंडी जि.ठाणे | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग अॅण्ड पेरीफेरल्स | २ |
| २९ | मुंबई | PBF08807T | आदर्श शिक्षण मंडळ संचलित आयडियल ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स काटेमानेवली रोड, कल्याण पूर्व, जि. ठाणे | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग अॅण्ड पेरीफेरल्स | २ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० | मुंबई | PBF70934T | विद्यासंकुल फाऊंडेशन संचलित संस्कृती ज्युनियर कॉलेज लालोंडे, पोस्ट निहे, जि. पालघर . | गट ४ | फील्ड टेक्निशियन-कॉम्प्युटिंग आणि पेरिफेरल्स<br>ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर | १ |
| | | | | गट ७ | बिझनेस करस्पॉंडट अँड बिझनेस फॅसीलेटर<br>डिस्ट्रिब्युटर सेल्समन | १ |
| ३१ | मुंबई | PBF08839T | नवोदय कन्नड सेवा संघ संचलित नवोदय ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स, मुलूंड चेक नाका, ठाणे जि. ठाणे. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ३२ | मुंबई | PBF70906T | नारायण एज्युकेशनल ट्रस्ट मुंबई संचलित नारायण ज्यु. कॉलेज, ढोकळी गाव, ठाणे . | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ३३ | मुंबई | PBF70896T | जीवन ज्योती एज्युकेशन सोसायटी संचलित आर्य गुरुकुल इंटरनॅशनल ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स, ऐरोली, ठाणे ४००७०८ | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | ४ |
| ३४ | मुंबई | PBF240108938T | श्री सद्‌गुरू वामनबाबा महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एकनाथ बी मढवी ज्युनिअर कॉलेज, आयरे रोड डोंबिवली पूर्व- जि. ठाणे. ४२१२०१ | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ३५ | मुंबई | PBF71037T | टिळक एज्युकेशन सोसायटी टिळक ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स वाशी, नवी मुंबई. | गट ४ | फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स<br>ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर | १ |
| ३६ | मुंबई | PBF71058T | टिळक एज्युकेशन सोसायटी संचलित टिळक ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स, घणसोली. | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ३७ | मुंबई | PBF71057T | टिळक एज्युकेशन सोसायटी संचलित टिळक ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, अँड कॉमर्स नेरुळ नवी मुंबई जि. ठाणे | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ३८ | अमरावती | PBF70931T | इग्निटिंग माईंड मल्टिपर्पज एज्युकेशन सोसायटी संचलित इग्नायटेड माईंड स्कुल ऑफ इंटल्क्च्युअल्स, योगीराज नगर, तपोवन अमरावती. | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ३९ | छ.संभाजी नगर | PBF70937T | वेंकटेश्वरा मानव विकास मंडळ संचलित ईगलवुड इंग्लिश स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज मु. पो. फुले पिंपलगाव ता. माजलगाव जि. बीड | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोवर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| | | | | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ४० | छ.संभाजी नगर | PBF08827T | लोणार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित गोदावरी दुधणा कनिष्ठ महाविद्यालय, माजलगाव ता.माजलगाव जि. बीड. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ४१ | छ.संभाजी नगर | PBF240109242T | विद्याविहार सेवाभावी संस्था संचलित संत तुकाराम ज्युनिअर कॉलेज मु.पो.कारवाडी ता. जि.हिंगोली | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ४२ | नाशिक | PBF71059T | मा. श्री. बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट संचालित परिक्रमा विज्ञान महाविद्यालय, काष्टी श्रीगोंदा जि. अहमदनगर | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ४३ | नाशिक | PBF240108911T | श्री. गणेश शिक्षण संस्था, कोपरगांव संचलित श्री. गणेश ज्युनिअर कॉलेज कोराले, राहाता, अहमदनगर | गट २ | फिल्ड टेक्निशियन एअर कंडीशनर<br>फिल्ड टेक्निशियन कंप्युटिंग अँड पेरिफेरल | १ |
| ४४ | नाशिक | PBF08731T | वेदांता फाउंडेशन सचलित तक्षधन्य ज्युनियर कॉलेज, आरडगांव ता. राहूरी जि. अहमदनगर. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशियन कंप्युटिंग अँड पेरीफेरल्स | १ |
| ४५ | नाशिक | PBF08791T | विवेकानंद प्रतिष्ठाण संचलित विवेकानंद प्रतिष्ठान कनिष्ठ महाविद्यालय, सावखेडा जि. जळगांव. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ४६ | नागपूर | PBF70923T | दिलीप जाधव शैक्षणिक संस्था, संचलित प्रियाविद्याविहार इंग्लीश स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, दुर्गा नगर,हिंगणा रोड, नागपुर. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | २ |
| ४७ | मुंबई | PBF240109165T | शेठ वसंतबेन नटवरलाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित शेठ विद्या मंदिर ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स कॉमर्स, वसंत नगरी , वसई पूर्व , जिल्हा पालघर. | गट ४ | फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स<br>ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर | २ |
| ४८ | मुंबई | PBF08855T | निष्ठा एज्युकेशनल वेल्फेअर सोसायटी संचलित विद्यावर्धिणी विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज,वलई पाडा रोड संतोष भुवन नालासोपारा,जिल्हा पालघर. | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | २ |
| ४९ | मुंबई | PBF240109134T | ज्ञान गंगा एज्युकेशन ट्रस्टचे संचलित आयरिस ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स धनीव बाग, मारुती सुझुकी शोरूमजवळ, पेल्हार रोड, नालासोपारा पूर्व.-४०१२०९ | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| | | | | गट ७ | बिझनेस करस्पाँडट अँड बिझनेस फॅसीलेटर<br>डिस्ट्रीब्युटर सेल्समन | ३ |
| ५० | मुंबई | PBF240109218T | श्री छत्रपती शिवाजी एज्युकेशनल सोसायटी संचलित, श्री आर.के अभंग माध्यमिक विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय,उल्हासनगर, जि.ठाणे | गट ४ | ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ५१ | पुणे | PBF08779T | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित, न्यु मॉडेल इंग्लिश स्कुल आणि कनिष्ठ महाविद्यालय, ताराबाई पार्क करवीर, ता.करवीर, कोल्हापूर. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ५२ | पुणे | PBF08795T | श्री.महासिद्ध शिक्षण प्रसारक मंडळ भंडारकवठे संचलित, श्री.बसवेश्वर सेकंडरी ॲण्ड हायस्कूल निंबार्गी ता.दक्षिण सोलापुर जि.सोलापुर | गट २ | फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स<br>फिल्ड टेक्निशियन -एयर कंडीशनर | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | ऑनलाईन नोंदणी क्रमांक | संस्थेचे नाव | व्यवसाय गटाचे नाव | मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव | तुकड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ५३ | पुणे | PBF71017T | सुभद्रा एज्युकेशन सोसायटी संचलित एसएनबीपी ज्युनिअर कॉलेज, रिव्हर रेसिंडन्सी जवळ, देहू-आळंदी रोड,चिखली, पुणे | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ५४ | पुणे | PBF240109296T | श्री.ए.पी.डी जैन पाठशाला सोलापुर संचलित वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड सायंन्स, अशोक चौक,सोलापूर ता. जि.सोलापूर | गट २ | फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स<br>फिल्ड टेक्निशियन -एयर कंडीशनर | १ |
| ५५ | छ.संभाजी नगर | PBF08772T | कै.दत्तात्रेय बाबुराव पाटील बहुउद्देशिय शिक्षण संस्था शेलगाव संचलित विद्यानिकेतन इंटरनॅशनल स्कुल येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोवर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| | | | | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ५६ | छ.संभाजी नगर | PBF240109015T | रेणुकामाता शिक्षण प्रसारक मंडळ जलालपूर संचलित माउली ज्ञानतिर्थ स्वतंत्र ज्युनिअर कॉलेज, टाकळी कुभंकर्ण ता. जि. परभणी. | गट २ | फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स<br>फिल्ड टेक्निशिअन- एअर कडींशनर | १ |
| ५७ | छ.संभाजी नगर | PBF240108964T | प्रज्ञा सेवाभावी संस्था संचलित गुरुदास कामत हायर सेकेंडरी स्कुल आर्टस अँड सायन्स मु.पो. इंचा ता.जि.हिंगोली | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोवर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| | | | | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| ५८ | छ.संभाजी नगर | PBF70938T | कै.तिलोकचंद कुचे शिक्षण प्रसारक मंडळ छ.संभाजीनगर संचलीत श्रीमती मथुरादेवी प्राथ. माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालय, बदनापुर ता.बदनापुर जि.जालना | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोवर<br>इरिगेशन सर्व्हिस टेक्निशिअन | १ |
| | | | | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरीफेरल्स | १ |
| | | | | गट २ | ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन- एअर कडींशनर | १ |
| ५९ | पुणे | PBF70979T | आदीत्य एज्युकेशनल फाऊडेशन्स पॅराडाईज ज्युनिअर कॉलेज संचलित पॅराडाईज ज्युनिअर कॉलेज नऱ्हे, पुणे. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर - डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | २ |
| ६० | पुणे | PBF240109353T | पुणा डिस्ट्रीक्ट एज्युकेशन आसोएशन संचलित श्री केतकेश्वर विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज निमगाव केतकी, ता. इंदापुर जि. पुणे | गट ९ | ऑरगॅनिक ग्रोवर<br>इरिगेशन सर्विस टेक्नीशियन | १ |
| ६१ | नागपुर | PBF240109376T | भारतीय विद्या प्रसारक संस्था संचलित नुतन भारत ज्युनियर कॉलेज, अभ्यंकर नगर नागपुर. | गट ४ | ज्युनिअर सॉफ्टवेअर - डेव्हलपर<br>फिल्ड टेक्निशिअन-कॉम्प्युटिंग ॲण्ड पेरिफेरल | २ |
| | | | | गट १० | गार्डनर<br>फ्लॉरिकल्चरिस्ट (ओपन कल्टीवेशन) | २ |